# १२. गुणवत्तापूर्ण शिक्षण–प्रशिक्षण

आपण २१ व्या शतकात पदार्पण केले आहे. ह्या नव्या शतकात आपणास अनेक आव्हाने पेलायची आहेत. या आव्हानांपैकी एक आव्हान आहे आमची ढासळली समाजव्यवस्था. समाजाचा कणा शिक्षक आहे. शिक्षक हा समाजपरिवर्तनाचा शिल्पकार मानला जातो, म्हणूनच आजची आव्हाने पेलायला तो समर्थ हवा व ह्याकरिता शिक्षणातून त्याचे 'अध्यापकीय व्यक्तिमत्त्व' विकसित व्हायला हवे. 'अध्यापकीय व्यक्तिमत्त्वा'त प्रामुख्याने पुढील गुणांचा समावेश होतो. बौद्धिक प्राप्ती, अध्यापन विषयाचे सखोल ज्ञान, मुलांच्या वर्तनाचे ज्ञान, व्यावसायिक कौशल्य, अध्यापनात अभिरुची, अध्यापनाप्रती सकारात्मक दृष्टिकोन, अभिव्यक्तीची स्पष्टता, विद्यार्थ्यांप्रती मदत करण्याची वृत्ती, प्रसन्न व्यक्तिमत्त्व, भावनिक धैर्य, सहनशीलता, व्यवसायाची प्रेरणा, जबाबदारीची जाणीव, निश्चित ध्येय, इतरांच्या दृष्टिकोनाचा आदर, पाठ्यांशावर प्रभुत्व, सहशालेय उपक्रमात अभिरुची, भाषेवर प्रभुत्व, विद्यार्थ्यांप्रती समभाव, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास कार्यात मदत करण्याची तळमळ, शिक्षणातील नवप्रवाहांची जाणीव, सृजनशीलता, शैक्षणिक उद्दिष्टांचे आकलन, विकासाच्या विविध टप्प्यांचे ज्ञान, मूल्यमापन कौशल्य, प्रयोगप्रेम, संवेदनशीलता इ. गुणांनी मिळून हे 'अध्यापकीय व्यक्तिमत्त्व' साकारत असते. व्यक्तिमत्त्वाच्या वरील सर्व पैलूंचा जर समतोल विकास झाला, तर शिक्षकाच्या गुणवत्तेत निश्चित वाढ होईल. शिक्षकाचे 'अध्यापकीय व्यक्तिमत्त्व' विकसित करणारे शिक्षण हे सर्वांग परिपूर्ण असावे. शिक्षकाची अध्यापकीय गुणवत्ता वाढविणारे असावे याकरिता अभ्यासक्रमाची एक संरचना सुचविण्यात येत आहे.

**अभ्यासक्रमाची संरचना:** अध्यापकीय व्यक्तिमत्त्वाचा समतोल विकास व्हावा म्हणून सध्या अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमापेक्षा वेगळा वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रम सुचविण्यात येत आहे.

**अभ्यासक्रमाचा उद्देश:** 'अध्यापकीय व्यक्तिमत्त्वा'चा विविध पैलूंचा समतोल विकास करणे.

**अभ्यासक्रम रचना:** प्रस्तुत अभ्यासक्रमाचा कालावधी दोन शैक्षणिक सत्र – प्रत्येक सत्र हे २०० दिवसांचे असेल अर्थात अभ्यासक्रम ४०० दिवसांकरिता सुचविण्यात येत आहे. कार्यतासांचा विचार केल्यास प्रत्येक दिवशी कार्यतास ६ तास एवढे असेल म्हणजेच २४०० कार्यतासांचा विचार करून अभ्यासक्रमाची रचना

सुचविण्यात येत आहे.

**अभ्यासक्रम विभागणी:** बी.एड्. प्रशिक्षणाची विभागणी तीन भागात करण्यात आली आहे.
(१) भाग १ – तात्त्विक भाग (२) भाग २ – प्रात्यक्षिक कार्य (३) भाग ३ – सेवाकाल

**बी.एड्. अभ्यासक्रम भाग १ :** तात्त्विक: बी.एड्. भाग १ मधील तात्त्विक भागाचे दोन विभाग पाडण्यात आले आहेत. विभाग 'अ' मध्ये खालील विषयांचा समावेश असेल.

**प्रश्नपत्र एक:** उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षक आणि शिक्षण (अ) शैक्षणिक तत्त्वज्ञान (ब) शैक्षणिक समाजशास्त्र

**प्रश्नपत्र दोन:** शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान (अ) विकासाचे मानसशास्त्र (ब) प्रायोगिक मानसशास्त्र

**प्रश्नपत्र तीन:** शिक्षक प्रशिक्षण (अ) शिक्षक प्रशिक्षण इतिहास – पार्श्वभूमी व विकास (ब) शिक्षक प्रशिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह.

**प्रश्नपत्र चार:** खालीलपैकी कोणतेही दोन ऐच्छिक विषय (१) शैक्षणिक संशोधन (२) Special Education (३) पर्यावरण शिक्षण (४) शैक्षणिक तंत्रज्ञान (५) लोकसंख्या शिक्षण (६) मूल्यशिक्षण (७) संगणक शिक्षण (८) प्रौढ शिक्षण (९) संप्रेषण (१०) Guidance and Counselling

**प्रश्नपत्र पाच:** विशेष अध्यापन पद्धती – (अध्यापन पद्धती विषय हे पदवी परीक्षेला असलेले असावेत)
(१)अध्यापन पद्धती (अ)(२)अध्यापन पद्धती (ब)

**बी.एड्. अभ्यासक्रम भाग १** विभाग ब: विशेष अध्यापन पद्धतीची अधिष्ठाने :-

सर्वप्रथम अध्यापन पद्धतींना अनुसरून खालील पाच गट पाडण्यात यावेत

(१) भाषा अध्यापन पद्धती (२) सामाजिक शास्त्र अध्यापन पद्धती (३) विज्ञान अध्यापन पद्धती (४) गणित अध्यापन पद्धती (५) वाणिज्य अध्यापन पद्धती

वरील गटांना अनुसरून खालील विषयांची शिफारस करण्यात येत आहे. (उदा. भाषा विषय गृहीत धरून)

(१) भाषा अध्यापनाचे तात्त्विक अधिष्ठान (२) भाषा अध्यापनाचे समाजशास्त्रीय अधिष्ठान (३) भाषा अध्यापनाचे मानशास्त्रीय अधिष्ठान (४) भाषा अध्यापनशास्त्र व पद्धती व अध्यापन तंत्र (५) भाषा व तंत्रज्ञान

(वरील विषय हे इतर विषयांकरितासुद्धा लागू आहेत फक्त त्यातील 'भाषा' हा शब्द गटानुसार बदलेल.)

(वरीलप्रमाणे बी.एड्. अभ्यासक्रमाचा भाग एक सुचविण्यात येत आहे.) बी.एड्. अभ्यासक्रम भाग १ च्या विभाग 'अ' व 'ब' च्या विषय अध्यापन व अध्ययनाचे स्वरूप

खालीलप्रमाणे असेल –

विभाग 'अ' व विभाग 'ब'मध्ये ज्या विषयांचा अंतर्भाव करण्यात आला आहे त्याचे अध्ययन–अध्यापन आशययुक्त अध्यापन पद्धतीने व्हावे म्हणजे प्रत्येक विषयातील संबोध तपशील प्रशिक्षणार्थींच्या लक्षात येऊन संबंध निर्मिती व तपशील मांडणी याची क्षमता त्यांच्या अंगी निर्माण होईल. आशयाशी संबंधित सामान्य ज्ञान, अधिक ज्ञान व उच्च ज्ञान प्राप्त करण्यात त्यांना मदत होईल. हे संबोध लक्षात येण्याकरिता अध्यापन प्रतिमानांचा अवलंब करण्यात यावा. तपशील व संबोध यांच्या सहसंबंधावर आधारित अभ्यासक्रम व्यवस्था असावी.

### बी.एड्. अभ्यासक्रम भाग १ ची मूल्यमापन योजना

### बी.एड. अभ्यासक्रम भाग २ – तात्त्विक भाग तक्ता क्र. १

| विवरण | तास | चाचणी तास | एकूण तास | गुण | चाचणी गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| बी.एड्. अभ्यासक्रम भाग १ – तात्त्विक भाग | | | | | | |
| विभाग अ:– शिक्षण विषयक विविध दृष्टिकोन | ५०० | ३० | ५३० | | | |
| विभाग ब:– अध्यापन पद्धती विषयक विविधदृष्टिकोन | ३०० | ३० | ३५० | | | |
| अंतिम परीक्षा | | | | | | |
| विभाग अ | | १५ | ३० | ५०० | | ५०० |
| विभाग ब | | १५ | | ५०० | | ५०० |
| (विभाग अ व विभाग ब मधा चाचणीचे गुण (प्रात्यक्षिक कार्य तास विश्लेषण तक्त्यात दिले आहेत.) | | | | | | |
| | ८०० | ०९० | ८९० | १००० | | १००० |

### बी.एड्. अभ्यासक्रम भाग ३ – छात्रसेवाकाल (Internship)

### छात्रसेवाकालाचे दोन भागात रूपांतर करण्यात येईल. त्याचे विवरण खालीलप्रमाणे तक्ता क्र. ३

| अ.–क्र. | कार्यविवरण | तास | गुण |
|---|---|---|---|
| (१) | छात्र अध्यापक प्रत्यक्ष शाळेत जाऊन तेथील प्रशासन व्यवस्थापन प्रशासकीय कामकाज ह्याची प्रत्यक्ष पाहणी करतील व त्याबाबतचा अहवाल सादर करतील. | २४० | १०० |
| (२) | छात्र अध्यापक संबंधित शाळेतील संबंधित सहायक शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष अध्यापन कार्य करतील व अहवाल सादर करतील | २४० | १०० |
| | | ४८० | ४०० |

## बी.एड्. अभ्यासक्रम भाग २ – प्रात्यक्षिक कार्य

## कार्यतास विश्लेषण तक्ता

### तक्ता क्र– २

| अ.क्र. | कार्यविवरण | तास | चाचणी तास | एकूण तास | गुण | चाचणी गुण | एकूण गुण | प्रात्यक्षिक कार्यतास विश्लेषण | कार्यतास विभाजन: कार्यविवरण | कार्यतास विभाजन: तास | कार्यगुण विभाजन: कार्यविवरण | कार्यगुण विभाजन: गुण | मूल्यमापन पद्धती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | सूक्ष्म अध्यापन कृतीसत्र | १०० | – | १०० | २० | – | २० | सूक्ष्म अध्यापन कृतीसत्र तात्त्विक भाग :– सूक्ष्म अध्यापना संबंधी विविध कौशल्यावर आधारित व्याख्यान व पाठनिदर्शन, सर्वप्रथम नैदानिक दृष्टिकोनाच्या आधारे अभावात्मक कौशल्य निदान विद्यार्थ्यांची गटात विभागणी करण्यात येईल, गटाकरिता कौशल्य पाठाचे निदान करण्यात येईल व त्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला ५ कौशल्यपाठ प्रत्येक अध्यापन पद्धतीकरिता घ्यावे लागतील. | १) तात्त्विक चर्चा व पाठ निदर्शन (२) अभावात्मक कौशल्य निदान (३) कौशल्यपाठ | १०<br>२०<br>७० | कृतीसत्र व अध्यापन यातील प्रत्यक्ष सहभाग | २० | १) प्रत्येक पाठाचे वेगळे मूल्यमापन करता कृतीसत्रात विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग, कौशल्य संपादनात त्याने केलेला प्रयत्नांना वाव यांच्या आधारावर मूल्यमापन राहील (२) पद निश्चयन श्रेणीचा अवलंब |

| अ.क्र. | कार्यक्षेत्र | तास | चाचणी तास | एकूण तास | गुण | चाचणी गुण | एकूण गुण | प्रत्यक्षिक कार्यभार विश्लेषण | कार्यभार विभाजन | कार्यगुण विभाजन | | | मूल्यमापन पद्धती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | कार्यक्षेत्र | तास | कार्यक्षेत्र | गुण | |
| (२) | सरावपाठ सत्र | ४०० | २४ | ४२४ | २०० | १०० | ३०० | सरावपाठ सत्रात प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यास प्रत्येक अध्यापन पद्धतीचे १० पाठ असे एकूण २० पाठ घ्यावे लागतील. सरावपाठाचे निरीक्षण कार्यशाळेतील विषय शिक्षक व शिक्षक प्रशिक्षक करतील. सहाय्यक शिक्षक हे वर्ग शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रियांचे निरीक्षण करतील तर प्रशिक्षक अध्यापन पद्धतीचे निरीक्षण करतील. एकूण २० पाठांपैकी १६ हे सलग सरावपाठ असतील तर ४ पाठ आवश्यकता अध्यापन पद्धतीस अनुसरून असतील. सत्र संपल्यावर सरावपाठाची चाचणी घेण्यात येईल. | १) तात्त्विक व दिग्दर्शन | १० | १) प्रत्येक पाठाकरिता १० गुण | २०० | १) प्रत्यक्ष कृतीसत्र सुरू असताना पर्यवेक्षक श्रेणीचा अवलंब प्रशिक्षक करतील.<br>(२) २० पाठांमधील अध्यापन पद्धतींना अनुसरून झालेले प्रत्यक्ष गुणांकन<br>(३) सरावपाठ चाचणी |
| | | | | | | | | | (२) सराव पाठ | १५० | (२) सरावपाठ चाचणी (५०+५०) | १०० | |
| | | | | | | | | | (३) सराव पाठ चाचणी परीक्षा | २४ | | | |

| अ.क्र. | कार्यविवरण | तास | चाचणी तास | एकूण तास | गुण | चाचणी गुण | एकूण गुण | प्रात्यक्षिक कार्यक्रम विश्लेषण | कार्यक्रम विभाजन | कार्यगुण विभाजन | | | मूल्यमापन पद्धती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | कार्यविवरण | तास | कार्यविवरण | गुण | |
| (३) | निरीक्षण कार्य | १० | - | १० | २० | - | २० | निरीक्षण कार्यात विद्यार्थी प्रत्यक्ष शाळेत जाऊन तेथील सहायक शिक्षकांच्या अध्यापन कार्याचे निरीक्षण करतील. कार्यामागील महत्त्वाचा उद्देश वर्गातील आंतरक्रियांचे विद्यार्थी वर्तनाचे ज्ञान छात्र अध्यापकांना व्हावे असा आहे. विद्यार्थ्यांची गटवार विभागणी करण्यात येऊन विविध शाळांमध्ये पाठनिरीक्षण घेतील. एक निरीक्षक प्राध्यापक त्यांचे समवेत राहतील. याकरिता वर्गअध्यापन आंतरक्रिया नोंद तक्ते वापरावे लागतील. | प्रत्येक अध्यापन पद्धतीचे १२ असे २४ पाठाचे निरीक्षण आणि अहवाल लेखन | १० | प्रत्येक अध्यापन पद्धती व अहवाल सादरीकरण (१०+१०) | २० | १) प्रत्येक पाठाचे वेगळे मूल्यमापन न करता सर्वकष मूल्यमापन (२) अहवाल सादरीकरण मूल्यमापन (३) प्रत्यक्ष निरीक्षण कार्यात विद्यार्थ्यांचा सहभाग कसा आहे याकरिता पदनिश्चयन श्रेणी. |
| ४) | आशययुक्त अध्यापन कृतीसत्र | १२० | १८ | १३८ | ५० | ५० | १०० | आशययुक्त अध्यापनाची संकल्पना : अध्यापन पद्धती आशय विश्लेषण पद्धत, आशय संरचना. | १) तात्त्विक विवेचन (२) प्रात्यक्षिक | १८<br>२४ | प्रत्येक अध्यापन पद्धतीस २५ गुण (१) | | १) विविध घटकांचे सादरीकरण (२) चाचणी : तात्त्विक भाग व आशय चाचणी |

| अ.क्र. | कार्यविवरण | तास | चाचणी तास | एकूण तास | गुण | चाचणी गुण | एकूण गुण | प्रात्यक्षिक कार्यतास विश्लेषण | कार्यतास विभाजन | | कार्यगुण विभाजन | | मूल्यमापन पद्धती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | कार्यविवरण | तास | कार्यविवरण | गुण | |
| | | | | | | | | आशययुक्त अध्यापन पद्धतीच्या विविध संकल्पनांशी छात्रअध्यापक परिचित व्हावा हा महत्त्वाचा उद्देश. याच सत्रात प्राधान्याने तात्त्विक विवेचन सत्रात अभ्यासक्रमाचे आशय विश्लेषण, पाठ्यवस्तूचे आशयविश्लेषण, साधननिर्मिती, म्हणजेच आशययुक्त अध्यापन ही संकल्पना छात्र अध्यापकास परिचित व्हावी हा उद्देश ह्या कृतीसत्राचा असेल. विद्यार्थ्यांचे अध्यापन पद्धतीनुसार गटात विभाजन करण्यात येईल. अध्यापन पद्धतीकरिता १० तास – आशय चाचणी व तात्त्विक भागाकरीता चाचण्या | कार्य मार्गदर्शन<br>(२) पाठ टाचण मार्गदर्शन व पाठ (वरील प्रमाणेच दुसऱ्या अध्यापन पद्धतीचे कार्यतास विभाजन राहील)<br>(४) आशय चाचणी<br>(५) तात्त्विक विवेचन चाचणी<br>(६) प्रात्यक्षिक चाचणी | १८<br>०६<br>०<br>०६<br>०६ | अभ्यासक्रम विश्लेषण तक्ते (५+५)<br>(२) पाठ्यवस्तू विश्लेषण तक्ते (५+५)<br>(३) साधन निर्मिती (५+५)<br>(४) आशययुक्त अध्यापन पाठ (१०+१०)<br>(५) आशयाची चाचणी २५+२५ | १०<br>१०<br>१०<br>२०<br>५० | (३) प्रत्यक्ष आशययुक्त अध्यापन कृतीसत्र सुरू असताना निरीक्षक प्राध्यापक पदनिश्चयन श्रेणीच्या आधारे मूल्यमापन करतील. |

| अ.क्र. | कार्यविवरण | तास | चाचणी तास | एकूण तास | गुण | चाचणी गुण | एकूण गुण | आशयिक कार्यभार विश्लेषण | कार्यभार विभाजन | | कार्यगुण विभाजन | | मूल्यमापन पद्धती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | कार्यविवरण | तास | कार्यविवरण | गुण | |
| | | | | | | | | केलेगेल्या जरी असल्या तरी त्याचे रूपांतर २५+२५ गुणांमध्ये करण्यात येईल. | | | | | |
| (५) | मूल्यमापन कृतीसत्र | ६० | ०६ | ६६ | १०० | २५ | १२५ | मूल्यमापन, कृतीसत्रात मूल्यमापन, संकल्पना, वार्षिक नियोजन, घटकनियोजन, घटकचाचणी इ. भागावर सर्वप्रथम तात्त्विक विवेचन होईल व त्यानंतर प्रात्यक्षिक कार्यामध्ये त्वरित बाबतीत प्रत्यक्ष कृतीवर भर असेल. | १) तात्त्विक भाग<br>(२) प्रात्यक्षिक कार्य (३) तात्त्विक भागावर चाचणी | २०<br>४०<br>०६ | १) घटक चाचणी (२०+२०)<br>(२) वार्षिक नियोजन (२०+२०)<br>(३) घटक नियोजन (१०+१०)<br>(४) तात्त्विक भागावर चाचणी | ४०<br>४०<br>२०<br>२५ | १) कृतीसत्रानंतर झालेल्या सादरीकरणाचे मूल्यमापन<br>(२) कृतीसत्रात झालेल्या तात्त्विक भागावर चाचणी<br>(३) प्रत्यक्ष कृतीसत्राच्या कालखंडात निरीक्षक प्राध्यापकाकडून पदनिश्चयन श्रेणीच्या माध्यमातून मूल्यमापन |
| (६) | समाजसेवा कृतीसत्र | ३० | ०६ | ३६ | २० | २५ | ४५ | प्रथम तात्त्विक भागावर अध्यापन करण्यात येईल. यात प्रामुख्याने शिक्षण व समाज यांचा सहसंबंध, व्यक्ती व समाज यांचा सहसंबंध, समाज विकासात शिक्षणाचे | १) तात्त्विक भाग<br>(२) आयोजन नियोजन<br>(३) प्रत्यक्ष समाजकार्य<br>(४) तात्त्विक | ०६<br>०६<br>१८<br>०६ | १) अहवाल सादरीकरण<br>(२) तात्त्विक भागावर चाचणी | २०<br>२५ | १) तात्त्विक भागावर चाचणी<br>(२) कार्याचा अहवाल सादरीकरणाचे मूल्यमापन<br>(३) प्रत्यक्ष समाजकार्य सुरू असताना निरीक्षक प्राध्यापक पदनिश्चयन श्रेणीच्या |

| अ.क्र. | कार्यविवरण | तास | चाचणी तास | एकूण तास | गुण | चाचणी गुण | एकूण गुण | प्रात्यक्षिक कार्यक्रम विश्लेषण | कार्यतास विभाजन | कार्यगुण विभाजन | | | मूल्यमापन पद्धती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | कार्यविभाग | तास | कार्यविवरण | गुण | |
| | | | | | | | | स्थान, शिक्षकाची समाजात भूमिका, समाज सेवा कशी करावी यांचा समावेश असेल. त्यानंतर प्रत्यक्ष समाजसेवा कार्याचे आयोजन व नियोजन कसे करावे याबाबी प्रशिक्षण देण्यात येईल. समाजसेवा कार्याचे दोन स्तर राहतील. (१) शहरी ग्रामीण (२) साक्षर शिक्षण समासेवा कार्यांकरिता विद्यार्थ्यांचे गटवार विभाजन करण्यात येईल. | सामान्य चाचणी | | | | माध्यमातून गुणात्मक मूल्यांकन |
| (७) | व्यक्तिमत्व विकास कृतीसत्र | ३० | ०६ | ३६ | २० | २५ | ४५ | प्रस्तुत कृतीसत्रात व्यक्तिमत्व विकास ह्या विषयाकरिता ५ घटकांचा तात्त्विक विवेचन (१) मूल्यशिक्षण (२) ताण व्यवस्थापन (३) आपत्ती व्यवस्थापन (४) प्रदूषण विरोध (५) | १) तात्त्विक भाग (२) प्रात्यक्षिक नियोजन (३) प्रात्यक्षिक कार्य (४) चाचणी | ०६<br>०६<br>१८<br>०६ | तात्त्विक भागावर चाचणी (२) प्रात्यक्षिक सादरीकरण | १५<br><br><br>२० | तात्त्विक भागावर चाचणी (२) प्रत्यक्ष अहवाल सादरीकरण (३) प्रत्यक्ष कार्य सुरु असताना पदविकाधारक श्रेणीच्या माध्यमातून प्राध्यापक गुणात्मक मूल्यांकन करतील |

| अ.क्र. | कार्यविषय | तास | चाचणी तास | एकूण तास | गुण | चाचणी गुण | एकूण गुण | प्रात्यक्षिक कार्यतास विश्लेषण | कार्यतास विभाजन | कार्यगुण विभाजन | | | मूल्यमापन पद्धती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | कार्यविवरण | तास | कार्यविवरण | गुण | |
| | | | | | | | | उद्योग शिक्षण (६) मानसशास्त्रीय व त्यानंतर प्रात्यक्षिक कार्यात (१) गटकार्य (२) Role Playing (३) गटचर्चा (४) परिसंवाद (५) क्षेत्रीय कार्य | | | | | |
| (८) | सहशालेय उपक्रम सत्र | २४ | ०६ | ३० | २० | २५ | ४५ | या सत्रात तात्त्विक भागाअंतर्गत व्यक्तीचे सांस्कृतिक जीवन, जीवनमूल्य भारतीय संस्कृतीतून अभिव्यक्त होणारी मूल्ये. शिक्षण व मूल्यसंवर्धन, मूल्यसंवर्धनात सांस्कृतिक उपक्रमाचे स्थान इ. भागावर तात्त्विक विवेचन होईल. त्यानंतर विद्यार्थ्यांचे गटवार विभाजन करण्यात येईल व गटाला सांस्कृतिक कार्यक्रम सादर करावे | (१) तात्त्विक भाग (२) प्रत्यक्ष कार्यक्रम सादरीकरण (३) चाचणी | ०६<br>१८<br>०६ | (१) अहवाल सादरीकरण व सहभाग (२) तात्त्विक भागावर चाचणी | २०<br>२५ | (१) सहशालेय उपक्रमात प्रत्यक्ष सहभाग व अहवाल सादरीकरण (२) तात्त्विक भागावर वस्तुनिष्ठ चाचणी (३) उपक्रम सुरू असताना निरीक्षक प्राध्यापक पदनिश्चयन श्रेणीच्या आधारे गुणात्मक मूल्यांकन करतील. |

| अ.क्र. | कार्यविवरण | तास | स्वाध्यायी तास | एकूण तास | गुण | स्वाध्यायी गुण | एकूण गुण | प्रात्यक्षिक कार्यास विश्लेषण | कार्यतास विभाजन | | कार्यगुण विभाजन | | मूल्यमापन पद्धती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | कार्यविवरण | तास | कार्यविवरण | गुण | |
| | | | | | | | | समाविष्ट. | | | | | |
| (१) | शैक्षणिक साहित्य निर्मिती प्रकल्प कृतीसत्र | २४ | १२ | ३६ | ३० | ५० | ८० | तात्त्विक भाग शैक्षणिक साहित्य महत्त्व शैक्षणिक साहित्यातील आधुनिक दृष्टिकोन प्रकल्प निवड व पद्धती प्रात्यक्षिक कार्यात । विद्यार्थ्यांचे गटवार विभाजन करून प्रत्यक्ष शैक्षणिक साहित्य बनवून घेणे. ह्यात प्राधान्याने खालील साधने बनवून घेता येतील. (१) पारंपारिक साधने (२) CAI package (३) रेडिओ कार्यक्रम (४) दूरदर्शन कार्यक्रम | १) तात्त्विक भाग (२) प्रात्यक्षिक (३) मूल्यमापन | ०६<br>१८<br>१२ | प्रत्यक्ष साहित्य निर्मितीचे गुण (२) प्रकल्प निर्मितीचे गुण (३) तात्त्विक भागावर चाचणी | २५<br>२५<br>३० | १) तात्त्विक भागावर चाचणी, साहित्य निर्मिती (२) प्रकल्प निर्मिती (३) प्रत्यक्ष कृती सुरू असताना पदनिश्चयन श्रेणीच्या माध्यमातून गुणात्मक मूल्यांकन |
| (१०) | निबंधलेखन | ४० | – | ४० | ४० | – | ४० | बी.एड्. अभ्यासक्रम विभाग १ मधील विभाग अ व ब वावर आधारित हे निबंध कार्य राहील. ह्यात विभाग अ चे २० निबंध व ब चे १० निबंध असे एकूण ४० निबंध | १) अभ्यासक्रम भाग १ विभाग अ (२) विभाग ब | २०<br>२० | विभाग अ<br>विभाग ब | २०<br>२० | निबंधाचे मूल्यांकन १० गुणांचा एक निबंध असे करावे व सरतेशेवटी सगळ्या गुणांचे रूपांतर २० गुणांमध्ये करण्यात येईल. |

| अ.क्र. | कार्यविवरण | तास | चाचणी तास | एकूण तास | गुण | चाचणी गुण | एकूण गुण | प्रात्यक्षिक कार्याचे विश्लेषण | कार्यकाल विभाजन | | कार्यगुण विभाजन | | मूल्यमापन पद्धती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | कार्यविवरण | तास | कार्यविवरण | गुण | |
| | | | | | | | | लिहावयाचे आहेत. प्रत्येक निबंधातील त्रुटी निरीक्षक व तज्ञ प्राध्यापकाने तात्काळतोंड विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावी. अर्थात निबंध लेखनाचे मूल्यांकन तात्काळतोंड विद्यार्थ्यांना करून द्यावे याचे गुणांकन गोपनीय राहणार नाही. | | | | | |
| (११) | प्रात्यक्षिक कार्य | ५० | - | ५० | ५० | - | ५० | बी.एड्. अभ्यासक्रम भाग १ मधील विभाग अ वर आधारित ५ विषयांच्या आधारावर हे प्रात्यक्षिक कार्य असेल. प्रात्यक्षिक कार्य कोणते असावे ह्याबाबत विद्यापीठ स्तरावर एक तज्ज्ञांची समिती हे निर्धारित करेल. | १) बी.एड्. अभ्यासक्रम प्रात्यक्षिक कार्य विभाग अ प्रत्येक प्रात्यक्षिकाकरिता १० तास | ५० | एका प्रात्यक्षिकास १० गुण ५ x १० | ५० | प्रात्यक्षिक कार्याचे अहवाल सादरीकरण आधारावर प्रत्येक अहवालाचे मूल्यांकन |
| (१२) | बी.एड्. अभ्यासक्रम भाग १ चाचणी | | | | | | | बी.एड्. अभ्यासक्रमातील १ मधील विभाग अ व विभाग ब ह्यावर चाचणी निर्धारित होईल. ही | | | विभाग अ<br>विभाग ब | १००<br>१०० | प्रत्येक प्रश्नपत्राकरिता १०० गुणांची चाचणी म्हणजेच ५००+५००=१००० व याचे रूपांतर १००+१०० |

| अ.क्र. | कार्यविवरण | तास | चाचणी तास | एकूण तास | गुण | चाचणी गुण | एकूण गुण | प्रत्यक्षिक कार्यतास विश्लेषण | कार्यतास विभाजन | | कार्यगुण विभाजन | | मूल्यमापन पद्धती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | कार्यविवरण | तास | कार्यविवरण | गुण | |
| | विभाग अ विभाग ब | | | | | १०० १०० | २०० | चाचणी वस्तुनिष्ठ असेल. त्याकरिता १० तास देण्यात येतील. प्रत्येक प्रश्नपत्रावर १०० गुणांची चाचणी असेल. म्हणजे ५००+५००=१००० गुणांची ही चाचणी असेल. ह्या ५००+५००रूपांतर १००+ १०० गुणांमध्ये करण्यात येईल. अंतर्गत गुणांकनात याचा समावेश असेल. (चाचणीकरिता उपलब्ध तास हे तक्ता क्र.१ मध्ये देण्यात आले आहे.) | | | | | अशा गुणात करण्यात येईल. |
| (११) | मानसशास्त्रीय प्रयोग | २० | - | २० | १० | - | १० | मानसशास्त्रीय प्रयोगात ५ प्रयोग अपेक्षित आहेत. हे प्रयोग कोणते असावे याचा निर्णय विषय तज्ज्ञ घेतील. मानसशास्त्रीय प्रयोगाकरिता देण्यास असलेले तास २० ह्यात | मानसशास्त्रीय प्रयोग | २० | मानसशास्त्रीय प्रयोग | १० | प्रत्येक प्रयोगाला १० पैकी गुणांच्या आधारावर मूल्यांकन करण्यात येईल. एकूण ५० गुणांचे १० गुणांत रूपांतर करण्यात येईल. |

| अ.क्र. | कार्यविवरण | तास | [illegible] तास | एकूण तास | गुण | [illegible] गुण | एकूण गुण | प्रात्यक्षिक कार्यभार विश्लेषण | कार्यभार विभाजन | कार्यानुरूप विभाजन | | | मूल्यमापन पद्धती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | कार्यविवरण | तास | कार्यविवरण | गुण | |
| | | | | | | | | चार तासाचा एक प्रयोग म्हणजेच अडीच तास प्रयोग व दीड तास प्रयोगाचे लेखनकार्य अपेक्षित आहे. | | | | | |
| (१४) | अंतिम प्रात्यक्षिक सराव पाठपरीक्षा | २४ | - | २४ | १०० | - | १०० | शहरातील विविध निवडक शाळांवर सरावपाठ अंतिम प्रात्यक्षिक पाठ परीक्षेचे कार्य होईल. | अध्यापन पद्धती अ अध्यापन पद्धती ब | १२<br>१२ | अध्यापन पद्धती अ अध्यापन पद्धती ब | ५०<br>५० | १) विद्यापीठातील शिक्षणशास्त्रातील प्रौढ अधिव्याख्याते (२) महाविद्यालयातील अधिव्याख्याते (३) शाळेतील प्रौढ सहायक शिक्षक अशील तीन व्यक्तींचे पथक पाठांचे निरीक्षण करून मूल्यांकन करतील. |
| | एकूण | ९५२ | ७८ | १०३० | ७०० | ५०० | १२०० | | | १०३० | | १२०० | |

टीप - (१) प्रात्यक्षिक कार्याचे गुणांकन हे अंतर्गत गुणांकन असेल.

टीप - (२) वरील तक्त्यात ज्या ठिकाणी पदनिश्चयन श्रेणीचा अवलंब करण्यात येईल असे नमूद केले आहे या सर्व श्रेणी तयार करण्याचे कार्य विद्यापीठातील तज्ज्ञ व्यक्तींच्या समितीकडे सोपविण्यात येईल.

टीप - (३) वरील तक्त्याचे अवलोकन केल्यास अवलनकाळ ९ ठिकाणी पदनिश्चयन श्रेणीचा अवलंब करण्यात आला आहे. या प्रत्येक पदनिश्चयनात मिळणाऱ्या श्रेणीचा अंतिम गुणांकनाच्या वेळी विचार करण्यात येईल.

(१) च्या संदर्भात मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र ग्राह्य मानले जाईल.
(२) च्या संदर्भात संबंधित साहाय्यक शिक्षकाचे प्रमाणपत्र ग्राह्य मानले जाईल. छात्र सेवकाला ह्या संदर्भात 'The teacher, Teacher Education, professional organization' ह्या पुस्तकात असे नमूद करण्यात आले आहे, की "During internship Futer teacher should learn naturally on the job under proper condition and with needed guidance. It should preferably be organised in laboratory demonstration selected school. It may be made stipendary if it helps to serve the purpose."

**वरील बी.एड्. अभ्यासक्रम भाग १, भाग २, भाग ३ चे स्वरूप खालीलप्रमाणे असेल.**

**तक्ता क्र. ४**

| अ. क्र. | विवरण | तास | चाचणी तास | एकुण तास | गुण | चाचणी गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | बी.एड्. अभ्यासक्रम भाग १ – तात्त्विक भाग | ८०० | ९० | ८९० | १००० | – | १००० |
| (२) | बी.एड्. अभ्यासक्रम भाग २ – प्रात्यक्षिक कार्य | ९५२ | ७८ | १०३० | ७०० | ५०० | १२०० |
| (३) | बी.एड्. अभ्यासक्रम भाग ३ – छात्र शिक्षक सेवा | ४८० | – | ४८० | २०० | – | २०० |
| | प्रशिक्षण काल | २२३२ | १६८ | २४०० | १९०० | ५०० | २४०० |

प्रस्तुत अभ्यासक्रमाचे अवलोकन केल्यास ह्या अभ्यासक्रमाची खालील वैशिष्ट्ये आहेत असे आपणास म्हणता येईल.

(१) अभ्यासक्रमात स्वयंअध्ययनावर भर आहे (२) प्रत्येक कृतीसत्रानंतर चाचणी (३) वस्तुनिष्ठ मूल्यमापनावर भर (४) छात्र अध्यापकाच्या सृजनशीलतेला वाव (५) प्रशिक्षणाची सर्वंकष योजना (६) छात्र-अध्यापकाच्या वैयक्तिक, सामाजिक, सांस्कृतिक, शारीरिक, बौद्धिक घटकांवर भर (७) प्रत्यक्ष अनुभवावर भर (८) प्रत्यक्ष शालेय कामकाजाचे अवलोकन, शाळेतील शिक्षकांचा सहवास, शालेय आंतरक्रियांचे ज्ञान (९) पदनिश्चयन श्रेणीचा अवलंब असल्याने गुणात्मक मूल्यांकन (१०) अध्यापन पद्धतीचे अध्यापन कौशल्य आत्मसात करणारी सर्वंकष योजना (११) शिक्षण संकल्पनेचा विविध अंगांनी विचार (१२) समाजसेवा श्रमप्रतिष्ठा जीवनमूल्य, आधुनिक मूल्य, नवनवीन प्रवाहाबाबतचे ज्ञान व जिज्ञासा जागृती, सृजनशीलता पाठ्यांश/अध्यापन पद्धती प्रभुत्व, अध्यापनाप्रती संस्कारात्मक दृष्टिकोन, विद्यार्थी वर्तनाचे ज्ञान, विविध व्यावसायिक कौशल्यांचा विकास, अशा विविध वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असा हा अभ्यासक्रम आहे. (१३) विस्तरीय मूल्यमापन योजना

शिक्षकांच्या गुणवत्ता वाढीकरिता अशा सर्वंकष अभ्यासक्रमाची आवश्यकता आहे. अशाप्रकारे २४०० तासांची २४०० गुणांची ही योजना सादर करण्यात येत आहे.